# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.06.2025** **वार:गुरुवार**

1. ऑक्टोबर दोनहजार सव्वीसपासून दोन टप्प्यात जातगणनेसह जनगणना
2. संसदेचं पावसाळी अधिवेशन 21 जुलैपासून
3. सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं भारतानं गेल्या दशकात अनुभवलं उल्लेखनीय परिवर्तन
4. पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड आणि प्लास्टीक निर्मूलनाचे संकल्प, यावर्षी राज्यात 10 कोटी वृक्ष लागवड आणि
5. विश्रांतीनंतर पुन्हा पाऊस

**<u>जनगणना</u>**

केंद्र सरकारनं ऑक्टोबर 2026 पासून दोन टप्प्यात लोकसंख्या जनगणना-2027 आणि जातींची गणना करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिला टप्पा पुढील वर्षी 1 ऑक्टोबरपासून जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि लडाख या डोंगराळ आणि बर्फाळ भागात राबविला जाईल. दुसरा देशव्यापी टप्पा 1 मार्च 2027 पासून राबविला जाईल.

**<u>संसद-अधिवेशन</u>**

पुढील महिन्याच्या 21 तारखेपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचं वेळापत्रक सरकारनं काल जाहीर केलं. ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्यासाठी संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्याच्या विरोधी पक्षांच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बातमीदारांना नवी दिल्लीत सांगितलं. हे अधिवेशन 12 ऑगस्टपर्यंत चालेल.

**<u>सरकारची-11-वर्षे</u>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं भारतानं गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी गेल्या 11 वर्षात प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करत आहे. त्यामध्ये आज, 'शिक्षण आणि क्रीडा-भारताची अमृत पीढी म्हणजे तरुण पिढीला सक्षम बनविण्याची गुरुकिल्ली' यावर आधारित हे वृत्त, माझ्या सहकारी सविता म्हसकर यांच्या आवाजात...

**दोन तृतीयांश लोकसंख्या 35 वर्षांपेक्षा कमी वयाची असलेल्या भारतात, तरुणच देशाचं भवितव्य घडवतील. आणि आज, सरकार शिक्षण आणि खेळांद्वारे भविष्यातील स्वप्नांचा पाया रचत आहे. शिक्षण क्षेत्रात, सरकारनं उच्च शिक्षणाद्वारे मूलभूत पातळीपासून समग्र आणि समावेशक शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी आराखडा तयार केला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 अंतर्गत, 2030 पर्यंत शालेय-पूर्व ते माध्यमिक स्तरापर्यंत 100 टक्के आणि 2035 पर्यंत उच्च शिक्षणात 50 टक्के विद्यार्थी नोंदणी करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. 2014 पासून, आयआयटी, आयआयएम आणि एम्समध्ये मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्यानं उच्च शिक्षण संस्थांची संख्या एकावन हजारवरून सत्तरहजारपेक्षा जास्त झाली आहे. पीएम श्री योजनेखाली 14 हजार**

**500 शाळा आधुनिक होत आहेत, दर्जेदार शिक्षण, समग्र विकास आणि 21 व्या शतकातील कौशल्यांवर तिथं लक्ष केंद्रित केलं जात आहे, तसंच त्या नजिकच्या शाळांसाठी मार्गदर्शक संस्था म्हणूनही काम करत आहेत. शिक्षणाबरोबरच, खेळाला राष्ट्रीय पातळीवर प्राधान्य दिलं जात आहे. खेलो इंडिया चळवळीअंतर्गत, एक हजारपेक्षा अधिक प्रशिक्षण केंद्रं उघडण्यात आली आहेत आणि तीन हजार तरुण खेळाडूंना वार्षिक 6 लाख 28 हजार रुपयांची मदत दिली जाते. टार्गेट ऑलिंपिक पोडियम योजना (TOPS) भारतातील अव्वल खेळाडूंना प्रशिक्षण, उपकरणं आणि आंतरराष्ट्रीय सहभागासाठी मदत करते. या प्रयत्नांना यश येत आहे, गेल्या दोन ऑलिंपिकमध्ये भारतानं 13 पदकं जिंकली आहेत आणि पॅरिस पॅरालिंपिकमध्ये विक्रमी 29 पदकं जिंकली आहेत. भारत आपल्या तरुणांना फक्त लिहायला आणि वाचायला शिकवत नाही, तर त्यांना मोठी स्वप्नं पाहण्यास, वेगानं धावण्यास आणि कधीही न थांबण्यास शिकवत आहे.**

**आरबीआय**

रेपो दराबाबत निर्णय घेण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची बैठक काल सुरू झाली. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा निर्णय उद्या जाहीर केला जाईल. अर्थ आणि उद्योग तज्ञांच्या मते, बँक रेपो दरात तिसऱ्यांदा कपात करण्याची शक्यता आहे.

**पर्यावरण-दिवस**

विश्व पर्यावरण दिवस आज साजरा करण्यात येत आहे. प्लास्टीक प्रदूषणावर मात करा अशी यावर्षीच्या पर्यावरण दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या अनुषंगानं राज्यात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**वृक्षलागवड**

राज्यातील वनाच्छदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत यावर्षी 10 कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावं, अशा सूचना त्यांनी एका बैठकीत दिल्या. राज्यातील राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग तसंच पालखी मार्गाच्या कडेला वृक्षारोपण करण्याची जबाबदारी आता वन विभागाकडं सोपविण्यात येईल. बांधकाम विभागाच्या वतीनं वृक्षारोपण आणि त्याच्या देखरेखीची माहिती आता एका ॲपद्वारे मिळणार आहे.

**देवराई-रत्नागिरी**

रत्नागिरीच्या चिपळूण तालुक्यातल्या कळंबस्ते गावात आज मानवनिर्मित देवराई तयार करण्याच्या उपक्रमाची सुरुवात होणार आहे. कळंबस्ते रेल्वे फाटकाजवळ सकाळी आठ वाजता नागरिकांनी श्रमदानासाठी उपस्थित राहण्याचं आवाहन प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांनी केलं आहे. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

**जुन्या काळापासून देवांच्या नावाने राखलेली जंगलं म्हणजेच देवरायांमुळे कोकण जैवविविधतेने नटलेलं आहे; मात्र अलीकडच्या काळात देवराया घटत चालल्यात. या पार्श्वभूमीवर, चिपळूणमध्ये प्रशासनाच्या पुढाकाराने आणि अन्य संस्थांच्या सहकार्याने देवराईनिर्मितीचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू होतोय. प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कळंबस्ते गावातल्या पशुसंवर्धन विभागाच्या साडेतीन एकर पडीक जागेवर देवराई उभी राहणार आहे. त्यात 149 प्रजातींची 1252 झाडं लावली जाणार असून, त्यात दुर्मीळ प्रजातीही असतील. या झाडांच्या फुला-फळांमुळे पक्षी, फुलपाखरं आणि मधमाश्या इथे आकर्षित होतील. त्यांच्या माध्यमातून आजूबाजूच्या परिसरातही बीजप्रसार होईल. अन्यत्र लागवडीसाठी रोपंही उपलब्ध होतील. प्रत्येक झाडावर क्यूआर प्लेट असेल आणि कोड स्कॅन केल्यावर त्या झाडाची माहिती मिळेल. यामुळे कळंबस्ते गावात उद्यानही**

**विकसित होणार आहे. राज्याच्या प्रत्येक तालुक्यात देवराई विकसित करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन आणि रोपं पुण्याच्या देवराई फाउंडेशनकडून मिळणार असून, पर्यावरण क्षेत्रात मोठं काम असलेल्या चिपळूणच्या सह्याद्री निसर्गमित्र संस्थेकडे या देवराईचं व्यवस्थापन सोपवण्यात आलं आहे. कोकण नव्याने बहरण्यासाठी हा उपक्रम नक्कीच पथदर्शी ठरणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**<u>वृक्षारोपण</u>**

वन महोत्सव सप्ताहानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे राज्यात सुमारे दोन लाख झाडांचं रोपण करण्यात येणार आहे अशी माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी काल एका बैठकीत दिली. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागीय मंडळांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येकी 25 हजार झाडांचं रोपण करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<u>वृक्ष-नवीमुंबई</u>**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातल्या आठही विभागांमध्ये या वर्षभरात सव्वा लाख वृक्षारोपणाचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. या कार्यक्षेत्रात 15 लाखाहून अधिक वृक्षसंपदा आहे. नेरुळ इथं क्लायमेट ॲक्शन लॅबच्या वतीनं आयोजित पाच किलोमीटर ग्रीन मॅरेथॉन स्पर्धेत काल युवक मोठ्या संख्येनं सहभागी झाले. प्लास्टिकला नकार - करु कापडी पिशव्यांचा स्विकार असं घोष यावेळी करण्यात आला.

**<u>पिंपरी चिंचवड प्लास्टीक</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आयोजित 'सिटी व्हिजनिंग कार्यशाळेत महिला बचत गटांप्रमाणं प्लास्टिक कचरा व्यवस्थापनावर कार्य करणाऱ्या काही स्थानिक घटकांनी प्लास्टिक पुनर्वापरावर सखोल चर्चा केली.

**<u>प्लास्टीक-लातूर</u>**

लातूर शहर मनपा आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उप प्रादेशिक कार्यालयाच्या वतीनं प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन आणि कापडी पिशवी वापराबाबत जागरुकता फेरी काढण्यात आली.

**<u>उंदीर</u>**

पुणे शहरातील एका नाट्यगृहात नाटकाचा प्रयोग सुरु असताना एका महिलेला उंदराचा त्रास झाल्यामुळं नाट्यगृहांमध्ये खाद्यपदार्थ नेण्यास बंदी घालणाऱ्या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक विभागाच्या बैठकीत घेण्यात आला. नाटकाचा प्रयोग सुरू होण्याआधी आणि संपल्यानंतर नाट्यगृहाची स्वच्छता आणि उंदरांसाठी पिंजरे लावणं, औषध फवारणी असे उपाय करण्यात येणार आहेत.

**<u>निकाल-नांदेड</u>**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी आणि पदव्युत्तर 183 अभ्यासक्रमांच्या एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांचे निकाल 13 दिवसांच्या आत जाहीर करण्यात आले. साडेआठ लाख उत्तरपत्रिकांचं स्कॅनिंग करून त्या चार जिल्ह्यातील 76 केंद्रांवर ऑनलाईन पाठविण्यात आल्यामुळं प्राध्यापकांना तत्काळ मूल्यांकन करता आलं.

**<u>पाऊस</u>**

सातारा शहरासह परिसरात काल दुपारनंतर पुन्हा एकदा जोरदार वाऱ्यासह जोरदार पावसानं हजेरी लावली. पुण्यात काल दिवसभरात पावसाच्या दमदार सरी पडत होत्या. रत्नागिरी जिल्ह्यात आठवडाभर पावसाचा जोर ओसरला होता; मात्र कालपासून अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. संध्याकाळी काही वेळ खूप जोराचा पाऊस

पडला. सांगली जिल्ह्यात अनेक दिवसांच्या विश्रांतीनंतर जोरदार पाऊस झाला. या पावसामुळं भाजीपाला विक्रेत्यांची तारांबळ उडाली.

दरम्यान, आपत्तीमध्ये जीवित आणि वित्तहानी टाळणं तसंच पायाभूत सुविधांचं होणारं नुकसान कमी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत एका बैठकीत दिले. आपत्ती व्यवस्थापनाचा निधी सौम्यीकरण कामांसाठी खर्च व्हावा. पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

**हवामान**

राज्यात विविध ठिकाणी आजही पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**